# बीड नगराध्यक्षांचा बेजबाबदारपणा दलित समाजाच्या मुळावर उठला केवळ अधिकाऱ्यांना नोटीस दिल्याने समाजाचा रोष कमी होणार नाही



## नगराध्यक्ष प्रेमलता पारवे मॅडम, कोणाचे मार्गदर्शन घेऊन नोटीसा काढल्या?

## गणेश पगारे,प्रमोद माने,किरण देशमुख यांना हिंम्मत असेल तर निलंबित करून दाखवा

बीड (सरकार): भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती घाण पाणी सोडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर चर,खडी टाकून अनेक आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बीड नगर परिषद स्वच्छता विभाग प्रमुख गणेश पगारे, बांधकाम अभियंता किरण देशमुख व पाणीपुरवठा अभियंता प्रमोद माने यावर नगराध्यक्षांसह मुख्याधिकाऱ्यांनी संबंधीत तीन अधिकाऱ्यांना नोटीस काढल्या व यामध्ये केवळ कस झालं, कशामुळे झाले याचे कारणे व स्पष्टीकरण द्यावे असे लेखी स्वरूपात सांगण्यात आले. मात्र नगराध्यक्ष मॅडम केवळ नोटीसा देऊन दलित समाजाचा रोष तुम्हाला कमी करता येणार नाही. जयंतीच्या दिवशी जो आनंदोत्सव सर्व जाती धर्माचे लोक करत होते. त्यावेळेस रस्त्यावर पाणी आल्याने या आनंदात विरजन पडल्याचे काम झाले. त्यामुळे तुम्ही कितीही नोटीसा काढल्या आणि पुढे काहीच होणार नाही हे पण बीडकरांना माहिती आहे. त्यामुळे आपला बेजबाबदारपणा आज दलित समाजाच्या मुळावर उठल्याचे दिसून येत आहे.

भारतीय घटनेचे शिल्पकार डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त बीड शहरात मोठ्या आनंदोत्सवाने वाजत गाजत आनंदोत्सवाने दलित समाजासह सर्व जाती धर्माचे लोक, बीडकर या महामानवाच्या जयंतीमध्ये सामील



झाले होते. याचवेळेस बीड नगरपालिकेचा भोंगळ कारभार आणि नगराध्यक्षांचा बेजबाबदारपणा दलित समाजाच्या मुळावर उठला. ऐन जयंतीच्या दिवशी रस्त्यावर कचखडी टाकून नगरपालिकेला जयंतीमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या लोकांना खाली पाडायचे होते का? आणि लोक पडले, जखमीही झाले. एवढेच नव्हे तर हा आनंदोत्सव साजरा करत असताना नालीतील घाण पाणी रस्त्यावर आले आणि बीड नगर पालिकेचा हलगर्जीपणा दिसून आला. मात्र जयंतीच्या दोन दिवस अगोदर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीच्या मिरवणुका कोणत्या दिशेने येणार आहेत. कशा जाणार आहेत. त्या रस्त्याची स्वच्छता, नाली, ड्रेनेज, लाईट या संदर्भात उपाय योजना का केल्या नाहीत. केवळ कचखडी टाकून लोकांना जाणून बुजून जखमी करायचे होते का? असा सवाल उपस्थित होत आहे. नगराध्यक्ष मॅडम बीड शहरात पहिल्यांदाच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची जयंती निघाली नाही. गेल्या अनेक वर्षांपासून जयंती साजरी होतेय. मिरवणुका निघताहेत. लोक आनंदोत्सवाने नाचतात पण असे घडले नाही. मात्र तुम्ही नगराध्यक्ष असताना तुमचा बेजबाबदारपणा दलित समाजाच्या मुळावर उठला नाही का? असा प्रश्न उपस्थित होतो. त्यामुळे केवळ नोटीस देऊन त्याचा खुलासा मागवून दलित समाजातील मनातील रोष आणि झालेला अवमान हे कधीही माफ करण्यासारखे नाही. त्यामुळे नोटीस कशासाठी द्यायची हिंमत असेल तर या तीन कर्मचाऱ्यांनाा निलंबित करून दाखवा तरच दलित समाजासह डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना मानणाऱ्यांच्या मनातील राग कमी होईल अशी चर्चा होत आहे.


beedsarkar

संपादक-आदोडे साहस

E-mail : beedsarkar @ Gmail.com

E-mail : beedsarkar @ Gmail.com ■ किंमत: १ रू. ■ पाने : ४

# बीडसरकार

बीड महाराष्ट्र ■ वर्ष १३ वे ■ अंक १४७ ■ गुरूवार १६ एप्रिल २०२६ ■ RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल दि.१७ एप्रिल २०२६ ■ पाने ४ ■ किंमत १ रू.

Beed MAHARASHTRA ■ Year 13 ■ Issu 147 ■ Thursday 16 April 2026 ■RNI NO. MAHMAR/2012/49908 ■ पोस्टल क्रं.No.L/SB/Beed/RNP-248/2025-2027


## पंतप्रधान आवास योजनेतील प्रकल्प व्यवस्थापनात अनियमितता प्रकरणी

# जीटी भारत कंपनीचे टेंडर रद्द करा;लोकशाही पत्रकार संघ महाराष्ट्र राज्य

# परळी नगर पालिकेतील सीएलटीसी यांची नेमणूक तात्काळ रद्द करा-जिल्हाध्यक्ष साहस आदोडे

बीड (सरकार): पंतप्रधान आवास योजनेतील राज्यात चाललेल्या व्यवस्थापनात अनियमितता दिसून येत आहे. यामध्ये जीटी भारत कंपनीला टेंडर दिले असून या कंपनीने जी माणसे नियुक्त केली आहेत. ते माणसे राजरोजपणे पैसे घेतल्याशिवाय काम करत नाहीत. एवढेच नव्हे तर बोगस कागदपत्रांची खेळ दाखवून परळी नगरपालिकेत मोठ्या प्रमाणात बोगस घरकुल दिली गेली आहेत. परळी नगर पालिकेतील जीटी भारत कंपनीने सीएलटीसी म्हणून ज्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती केली. त्यांचे कामे काय? आणि करतात काय? या सगळ्या गोष्टी आता समोर आल्या आहेत. त्यामुळे सीएलटीसी परळी येथील काम करणाऱ्या कर्मचाऱ्या विरोधात लोकशाही पत्रकार संघ अजित कवडे उपसचिव तथा मुख्य अधिकारी व अभियान संचालक राजस्तरीय प्रकल्प व्यवस्थापन



यंत्रणा पीएमयु शहरी २.० यांच्याकडे केली जाणार आहे. सदरील परळी नगर पालिकेतील या कर्मचाऱ्यांनी कशा पद्धतीने बोगस घरकुलसाठी कागदपत्र दिली. एकाच कुटुंबात घरकुलला मंजूरी देऊन पैसे वाटप केले. ८०० पेक्षा जास्त फाईल बोगस तयार करून त्याला मंजुरी दिली. व ज्या महाशयांनी या घरकुल धारकांना पैसे वाटप केले आणि ज्या इंजिनिअरने हा सावळा गोंधळ करून जीटी कंपनीची कशी दुर्दशा केली या संदर्भात पत्र व्यवहार करून, तक्रार करून या संदर्भात कारवाईसाठी सोमवारी मागणी केली जाणार आहे त्यामुळे पुढील अंकात वाचा परळीतील त्या दोन कर्मचाऱ्यांनी परळी शहरात नगर पालिकेतंर्गत बोगस घरकुलाचा महाघोटाळा कसा केला?

# महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान

## निवडणूक आयोगाने जाहीर केला कार्यक्रम

मुंबई (सरकार):महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोगाकडून महाराष्ट्रातील विधान परिषद निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. विधान परिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार आहे. १२ मे रोजी सकाळी ९ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान होईल. तर १२ मे रोजीच निकाल जाहीर होणार आहे.

विधान परिषदेच्या निवडणुकीचा संपूर्ण कार्यक्रम निवडणुकीची अधिसूचना जारी करणे : २३ एप्रिल, २०२६

उमेदवारी अर्ज भरण्याचा शेवटचा दिवस: ३० एप्रिल २०२६ उमेदवारी अर्जांची छाननी: २ मे २०२६ उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख: ४ मे २०२६ मतदानाची तारीख: १२ मे २०२६ मतदानाची वेळ: सकाळी ९ वाजेपासून ते संध्याकाळी ४ वाजेपर्यंत आहे.

मतमोजणी: १२ मे २०२६ संध्याकाळी ५ वाजता निवडणूक प्रक्रिया पूर्ण करण्याची अंतिम तारीख: १३ मे २०२६ विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार. विधान परिषदेच्या ९ सदस्यांचा कार्यकाळ १३ मे रोजी संपुष्टात येणार आहे. विधानसभेतील संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला ५, शिवसेना २, राष्ट्रवादी १ आणि महाविकास आघाडी १ जागा येण्याची शक्यता आहे. राष्ट्रवादीकडे अतिरिक्त १३ मतं असल्यामुळे महायुतीने आणखी



उमेदवार देण्याचे ठरवल्यास निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता कमी आहे.

विधान परिषदेतील उद्धव ठाकरे (शिवसेना – उबाठा) नीलम गोऱ्हे (शिवसेना) शशिकांत शिंदे (राष्ट्रवादी – शरद पवार गट) अमोल मिटकरी (राष्ट्रवादी – अजित पवार गट) गोपीचंद पडळकर (भाजप) रणजितसिंह मोहिते-पाटील (भाजप) राजेश राठोड (काँग्रेस)प्रवीण दटके (भाजप) रमेश कराड (भाजप) महायुतीचे ८ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात दरम्यान, विधान परिषदेचा एक आमदार निवडून येण्यासाठी २८ मतांचा कोटा आवश्यक आहे. महायुतीत भाजप (१३१ आमदार), एकनाथ शिंदे यांची शिवसेना (५७ आमदार) आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी (४० आमदार) असे बलाबल पाहता महायुतीचे ८ उमेदवार सहज निवडून येऊ शकतात. तर महाविकास आघाडीचे एकूण संख्याबळ ४६ आहे. त्यामुळे त्यांचा केवळ एकच उमेदवार सहज निवडून येऊ शकतो. दुसऱ्या जागेसाठी त्यांना १० मतांची जुळवाजुळव करावी लागेल, जे सध्याच्या स्थितीत कठीण दिसत आहे.

# १ मेपासून रिक्षा-टॅक्सीचालकांसाठी मराठी अनिवार्य!

## भाषा येत नसेल तर परवाना होणार रद्द

मुंबई (सरकार) महाराष्ट्र दिनापासून परवानाधारक रिक्षा व टॅक्सीचालकांना मराठी भाषा येणे बंधनकारक करण्यात येणार आहे. याबाबत मोटार परिवहन विभागाच्या ५९ प्रादेशिक व उपप्रादेशिक कार्यालयांमार्फत परवाना तपासणी मोहीम राबवण्यात येणार आहे. संबंधित चालकांना मराठी लिहिता व वाचता येते का, याची पडताळणी केली जाणार आहे.


मराठी भाषेचे ज्ञान नसलेल्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येणार आहेत. मोटार परिवहन विभागामार्फत रिक्षा किंवा टॅक्सीचालकांना परवाना देताना स्थानिक भाषेचे म्हणजेच मराठी भाषेचे ज्ञान असणे, हा नियम आधीपासूनच लागू आहे.

मात्र, मुंबई महानगर क्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, नागपूर यासारख्या शहरांत



अनेक परवानाधारक चालकांना प्रवाशांशी मराठीत संवाद साधता येत नाही. काही चालक मराठी बोलण्यास टाळाटाळ करतात, अशा तक्रारी मोठ्या प्रमाणात प्राप्त झाल्या आहेत. ज्या प्रदेशात आपण राहतो, त्या प्रदेशाची भाषा व्यवसायासाठी शिकणे हे प्रत्येकाचे कर्तव्य आहे.

आपल्या मातृभाषेचा अभिमान असणे जितके आवश्यक आहे, तितकेच इतर राज्यांत व्यवसाय करताना त्या राज्याच्या भाषेचा आदर करणेही महत्त्वाचे आहे. म्हणूनच १ मेपासून सर्व परवानाधारक रिक्षा व टॅक्सीचालकांना मराठी भाषा लिहिता व वाचता येणे बंधनकारक राहील. नियमांचे पालन न करणाऱ्या चालकांचे परवाने रद्द करण्यात येतील. नियमांकडे दुर्लक्ष करून चुकीच्या पद्धतीने परवाने देणाऱ्या परिवहन अधिकाऱ्यांवरही कठोर कारवाई करण्यात येईल, असे निर्देश परिवहन मंत्री सरनाईक यांनी दिले.





# सुविधा केंद्रात नोंदणी तपासणीसाठी पैशांची मागणी;कामगारांची लेखी तक्रार

बीड (सरकार): बीड जिल्हा कामगार कार्यालयातील भ्रष्टाचार पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला असून यापूर्वी देखील या कार्यालयाच्या बाबतीत अनेक तक्रारी आल्या होत्या परंतु अधिकाऱ्यांनी कर्मचाऱ्यांना पाठीशी घातल्याने पुढे कारवाई थंडावली होती.

पाटोदा येथील तालुका सुविधा केंद्रामध्ये कर्मचाऱ्यांकडून कामगारांकडून नोंदणी व्हेरिफाय करण्यासाठी पैसे उकळले जात असल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. याबाबत बांगर (रा. ता. पाटोदा, जि. बीड) यांनी सरकारी कामगार अधिकाऱ्यांकडे लेखी तक्रार दाखल केली आहे. तक्रारीनुसार, तालुका सुविधा केंद्रातील शिपाई मनोज सोमवंशी यांच्या माध्यमातून इंचार्ज फरहान पठाण तसेच डाटा एन्ट्री ऑपरेटर जयराम जाधव, आकाश गवळी आणि सचिन शेजवाळ हे सर्व कर्मचारी संगनमताने कामगारांकडून पैसे घेत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. नोंदणी फॉर्म व्हेरिफाय करण्यासाठी प्रत्येकी ५०० रुपये द्यावे लागतात, तसेच हे पैसे सरकारी अधिकारी सुधाकर कोणाळे यांना द्यावे लागतात, असे सांगून कामगारांची दिशाभूल केली जात असल्याचेही तक्रारीत नमूद आहे.

तक्रारदार बांगर यांनी स्वतः नोंदणी व्हेरिफायसाठी गेल्यानंतर त्यांच्याकडूनही पैशांची मागणी करण्यात आली. त्यांनी ऑनलाइन पैसे भरल्यानंतरच त्यांचा फॉर्म मंजूर करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले आहे. या प्रकारामुळे अनेक कामगार आर्थिक शोषणाला बळी पडत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणात ऑनलाइन व्यवहाराचे पुरावेही तक्रार अर्जासोबत जोडण्यात आले असून संबंधित कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई करण्याची मागणी तक्रारदाराने केली आहे. या गंभीर आरोपांमुळे तालुका सुविधा केंद्राच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून कामगार विभागाने याची तातडीने दखल घेण्याची गरज व्यक्त होत आहे.कामगार अधिकारी कोणाळे जबाबदार की कंत्राटी कर्मचारी ?

जिल्हा कामगार अधिकारी असलेले कोणाळे हे आपल्या कामांमध्ये बाकीच्यांना हस्तक्षेप करू देत नाहीत असे म्हटले जाते. मात्र बऱ्याच तालुक्यातील कंत्राटी कर्मचारी आणि काही पर्मनंट अधिकारी आणि कर्मचारी सुद्धा कोणाले आहे यांचे नाव पुढे करून, पैसे मागत असल्याची माहिती आहे. तुमचे काम करून देतो मात्र आमच्या साहेबांना आम्हाला पैसे द्यावे लागतात, यामुळे पैसे दिले शिवाय काम होणार नाही अशी बतावणी हे कर्मचारी करीत असल्याचे सांगण्यात येते. यामुळे असा प्रश्न निर्माण झाला आहे की कामगार अधिकारी कोणाळे यांचे नाव पुढे करून दुसरेच अधिकारी विशेषता कंत्राटी कर्मचारी स्वतःचा फायदा करून घेत आहेत का. ? कामगार अधिकारी असलेले कोणाळे यांनी सुद्धा याबाबत स्पष्टीकरण देण्याची गरज आहे.

# राखी परंपरेची आधुनिक रंगत

श्रावणातील महत्त्वाचा आणि सगळ्यांचा आवडता सण रक्षाबंधन. रक्षाबंधन म्हणजे बंधनाचं नातं, प्रेमाचं प्रतीक आणि आनंदाचा उत्सव. प्रत्येक भावाबहिणीच्या नात्यात गोडवा आणणारा हा सण फॅशनसुद्धा सजवतो! या सणात प्रत्येक स्त्रीया नटायला आणि खास कपडे परिधान करायला उत्सुक असतात. साडीपासून ते इंडो-वेस्टर्नपर्यंत, पारंपरिक दागिन्यांपासून फ्यूजन लूकपर्यंत... आजच्या ट्रेंडमध्ये राखीसाठी खास फॅशनचे रंग खुलत आहेत.

## सिबलिंग ट्विनिंग

हॅशटॅग राखी ट्विनिंग हे सध्या खूप ट्रेंडिंगमध्ये आहे. एखादे चांगल्या रंगाचं कापड घेऊन तुम्ही शिवू शकता. सेम टू सेम राखी आऊटफिट होईल आणि बहीण-भावाचे फोटोशूटसुद्धा छान होईल.







## इंडो वेस्टर्न

रक्षाबंधनात तुम्ही इंडो वेस्टर्न आऊटफिट स्टाईल करू शकता. यामध्ये काहीतरी वेगळा लुक दिसेल. इंडो वेस्टर्नमध्ये वेगवेगळे पॅटर्नही ट्राय करू शकाल.



## कुर्ती प्लाझो

आपल्याला साधा सूट घालायचा असेल, तर पॅन्टसोबत कॉलर नेकलाइनसह डिझाइनची कुर्ती तुम्ही परिधान करू शकता. या कुर्तीवर तुम्ही मोठे कानातले परिधान केले, तर तुमचा लुक खूप उठून दिसेल.



## हेवी दुपट्टा

एखादा गडद रंगाचा ड्रेस तुम्ही घेतलात आणि भरलेला दुपट्टा असेल, तर त्यावर तुमचा लूक छान दिसतो. रक्षाबंधनसाठी हा आऊटफिट परफेक्ट आहे.

## काँट्रास्ट ट्विनिंग

ट्विनिंग करणे म्हणजे एकाच रंगाचे कपडे घालणे हे गरजेचे नाही. तुम्हाला हवे असल्यास तुम्ही कॉन्ट्रास्ट कपडे परिधान करू शकतात. काँट्रास्ट फॅशन सध्या ट्रेंडमध्ये असून तुम्ही अशाप्रकारे देखील ट्विनिंग करू शकतात. जसे की भावाने काळ्या रंगाची कुर्ती परिधान केली असेल, तर बहिणीने सफेद रंगाचा सलवार कुर्ता किंवा साडी परिधान करावी. बहीण-भावांचा लूक सुंदर दिसेल.

## फ्लोरल धोती सेट

तुम्ही अशा प्रकारचा किंवा यामध्ये अनेक पॅटर्न मिळतात त्यामध्ये ड्रेस घेऊ शकता. खूप छान लूक होईल, सध्या हे मार्केटमध्ये खूप ट्रेंडी आहे. मोठी कुर्ती आणि धोती पॅन्ट अतिशय सुंदर लूक दिसेल.

## अनारकली

रफल्स, फ्रिल्स आणि भरपूर प्लेट्स असलेला अनारकली सेट सध्या अधिक ट्रेंडमध्ये आहे. यावर त्याच रंगाची प्लाझो अधिक शोभून दिसते.



## पेस्टल शेड्स

पेस्टल रंगांचे कपडे तुमच्या त्वचेला एक वेगळी चमक देतात आणि ते दिसायला खूप सुंदर दिसतात. तुम्ही पेस्टल रंगाचे सूट किंवा साडी निवडू शकता.





सौंदर्य तुझं
प्राची शिरकर

---

# आयुर्वेद, निसर्गोपचार आणि नवसर्जनशीलतेचा एक दीपस्तंभ



डॉ. मेधा मेहेंदळे
कर्तृत्ववान ती राज्ञी

आरोग्य हा प्रत्येक व्यक्तीच्या जीवनाचा मूलभूत आधार आहे आणि हे आरोग्य नैसर्गिक पद्धतीने जपण्याचे व त्याचा प्रसार करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करणाऱ्या थोर व्यक्तींमध्ये डॉ. मेधा मेहेंदळे यांचे नाव अत्यंत सन्मानाने घेतले जाते. त्या एक आयुर्वेद संशोधक, निसर्गोपचारतज्ज्ञ आणि तन्वी हर्बल्सच्या संस्थापिका आहेत. आयुर्वेद, वनौषधी संशोधन, समाजसेवा, उद्योजकता, शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्र अशा विविध क्षेत्रांमध्ये त्यांनी आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे.

आजच्या या लेखामधून आपण मेधाताईंचा आपल्या सगळ्यांसाठी प्रेरक असणारा प्रवास जाणून घेणार आहोत.

उपजतच संशोधनात्मक वृत्ती लाभलेल्या मेधाताईंचा जन्म देसाई घराण्यात झाला. मेधाताईंचे वडील डॉ. सी. ग. देसाई हे उत्कृष्ट प्रोफेसर, संस्कृत पंडित, अध्यात्मिक लेखक आणि जगन्मित्र होते. शाळेत असल्यापासूनच विविध स्पर्धा, उपक्रम यामधून मेधाताईंच्या धाडस आणि नेतृत्वगुणांची चुणूक दिसत होती. त्यांच्या वडिलांकडे संस्कृत शिकण्यासाठी आयुर्वेदाचे विद्यार्थी येत त्यामुळे घरातूनच संस्कृत आणि आयुर्वेद विषयातील शब्द सतत कानावर पडत असल्याने त्यानी त्यांच्या जिज्ञासु वृत्तीने वनौषधी सत्त्वावर गहन संशोधन करून 'हर्बल तन्वी पॅथी'ची निर्मिती केली. ही एक अद्वितीय उपचारपद्धती आहे, ज्यामध्ये वनस्पतींपासून सत्वरूपात मिळवलेले घटक चुटकीभर प्रमाणात घेऊन तयार केलेल्या टॅबलेट्सचा समावेश होतो. पारंपरिक वनौषधी पावडरच्या तुलनेत या टॅबलेट्स अधिक सघन (कॉन्संट्रेटेड) आणि परिणामकारक असून, त्यांचा परिणाम जलद व स्थिर असतो. त्यामुळे घराघरात या हर्बल तन्वी टॅबलेट्समुळे नैसर्गिक पद्धतीने आरोग्य उत्तम राहू लागले.



वैशाली गायकवाड

अनेक जटिल आणि दीर्घकालीन आरोग्य समस्यांवर प्रभावी उपाय मिळाले आहेत. डायबिटीस, बीपी, सांधेदुखी, गुडघेदुखी, वंध्यत्व (इन्फर्टिलिटी), पार्किन्सन्स, सोरायसिस, अस्थमा, केस व त्वचारोग, मुलांची उंची वाढवणे, अशा असंख्य तक्रारींवर तन्वी हर्बल्सचे उपचार लाभदायक ठरले आहेत. ही औषधे केवळ परिणामकारकच नाहीत, तर रासायनिक घटकांपासुन मुक्त असल्यामुळे कोणत्याही दुष्परिणामाविना नैसर्गिक स्वास्थ्य टिकवतात. भारताबाहेर दुबई, मलेशिया, सिंगापूर, बहारीन, कॅनडा, अमेरिका, थायलंड इत्यादी देशातही प्रदर्शनात भाग घेऊन त्यानी तन्वी हर्बलचा प्रचार प्रसार जगभर केला आहे.

मेधाताईंच्या यजमानांचे वडील लहानपणीच गेल्याने त्यांच्या आईनेच नोकरी करून त्यांना वाढवले. त्यामुळे मेधाताईंनी दोन्ही मुलींवर लक्ष केंद्रीत करावे या भावनेतून त्यांनी मेधाताईंना व्यवसाय करण्यास काही काळ मनाई केली होती. मेधाताईंनी जिद्दीने स्वतःबरोबर मुलींनाही घडवले. त्यामुळे कालांतराने विरोधाचे रूपांतर सकारात्मक सहकार्यात परिवर्तित झाले. मेधाताईंच्या यजमानांनी देखील सरकारी नोकरीतून निवृत्त झाल्यावर तन्वी हर्बल्सला सहकार्य केले आहे.

डॉ. मेधाताई मेहेंदळे यांचं कार्य केवळ व्यवसायापुरतं मर्यादित न राहता सेवाभावी वृत्तीने ते ओतप्रोत भरलेले आहे. गेली ३० वर्षे तन्वी हर्बल क्लिनिक्समार्फत रुग्णांना मोफत तपासणीची सुविधा दिली जाते. त्याचबरोबर पंचकर्म व निसर्गोपचार उपचारांचीही सोय उपलब्ध करून दिली आहे. ही सर्व केंद्रे अत्याधुनिक असून, महाराष्ट्रभर व ऑनलाईन स्वरूपात सेवा दिली जाते. औषधे क्लिनिक्समध्ये, केमिस्ट दुकानांमध्ये तसेच ऑनलाईन व तन्वी ऑफिसमधून होम डिलिव्हरीच्या माध्यमातूनही उपलब्ध आहेत.

वैद्यकशास्त्रासोबतच त्यांनी एक यशस्वी उद्योजिका म्हणूनही स्वतःचा ठसा उमटवला आहे. अनेक नवनवीन उद्योजकांना मार्गदर्शन विपुल लेखन, अनेक सांस्कृतिक संस्थांना स्पॉन्सरशिप देऊन त्यांना पाठबळ देणं, विविधांगी स्पर्धा उपक्रम राबविणे, जाहिरात व ब्रॅण्डिंग क्षेत्रातील त्यांचा उत्कृष्ट अनुभव व प्रयोग नवउद्योजकांसाठी प्रेरणास्त्रोत ठरले आहेत. त्यांना मिळालेला आंतरराष्ट्रीय प्रियदर्शिनी पुरस्कार, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सतर्फे माधुरी दीक्षित यांच्या हस्ते प्रदान करण्यात आलेला महिला उद्योजिका पुरस्कार, उद्योगश्री हे विविध पुरस्कार त्यांच्या कामगिरीची पावतीच आहेत.

डॉ. मेहेंदळे यांच्या कार्याची साखळी त्यांच्याच कुटुंबातील पुढील पिढीनेही समर्थपणे चालवली आहे. त्यांच्या दोन्ही कन्या डॉ. मानसी व डॉ. रुचा, तसेच जावई डॉ. पुष्कराज धामणकर आणि प्रतीक पै तन्वी हर्बल्सची जबाबदारी आत्मीयतेने पार पाडत आहेत. डॉ. मानसी आणि डॉ. रुचा यांच्या क्लिनिक्समध्ये रुग्णांना मोफत तपासणी दिली जाते. याशिवाय आवश्यकतेप्रमाणे पंचकर्म उपचारही केले जातात. या डॉक्टर कन्या सोशल मीडियावर (इन्स्टाग्रामवर) रोज हेल्थ टिप्स शेअर करून सामान्य जनतेमध्ये आयुर्वेदाचा प्रसार करतात.

डॉ. मेहेंदळे या आनंद विश्व गुरुकुल या शाळेच्या संस्थापिका आणि माजी अध्यक्षा आहेत. त्यांनी केवळ वैद्यकीय क्षेत्रातच नव्हे, तर शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे. त्यांनी 'डॉटर' हा हिंदी चित्रपट, 'गोजिरी' व झुम इ्याम झॉम्बी हे मराठी चित्रपट आणि 'आयुष्यमान भव' ही टेलिफिल्म निर्मित करून समाजाला सशक्त संदेश दिला आहे. या सर्व कलाकृतींना अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले आहेत.

त्यांच्या प्रेरणादायी जीवनप्रवासाचे दर्शन घडवणारा 'तन्वीचे आभाळ' हा चरित्रग्रंथ प्रा. डॉ. शुभा चिटणीस यांनी लिहिला असुन, तो वाचकप्रिय ठरला आहे. यात डॉ. मेहेंदळे यांच्या जीवनातील संघर्ष, संशोधन, आत्मीयता आणि ध्येयवेडे प्रयत्न यांचे दर्शन होते.

डॉ. मेहेंदळे आणि तन्वी संचालकांनी भारतासह परदेशातही मोफत व्याख्यानांद्वारे आयुर्वेद आणि निसर्गोपचाराचे महत्त्व अधोरेखित केले आहे.

आयुर्वेद हा केवळ औषधोपचार नव्हे तर जीवनशैली असल्याचे त्या आवर्जून सांगतात. आयुर्वेदाचा प्रसार व प्रचार हेच उद्दिष्ट समोर ठेवून त्यांची ४० ते ५० क्लिनिक्स व फ्री चेकअप कॅम्प रुग्णांसाठी सेवा पुरवत आहेत.

सुरुवातीला 'वन वुमन शो' असणाऱ्या तन्वी हर्बल्सच्या या रोपाचे रूपांतर वटवृक्षात करण्यासाठी आता संपूर्ण कुटुंबच तन्वीमय झाले आहे. भविष्यात महिलांनी देखील अधिकाधिक व्यवसायात येऊन स्वतः आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्याचा मोलाचा सल्ला त्या समस्त महिलांना देतात.

डॉ. मेधाताई मेहेंदळे या आजच्या काळात आयुर्वेदाची पताका उंचावणाऱ्या, लोकांच्या आरोग्याची जबाबदारी मनापासून निभावणाऱ्या एक अत्यंत आदरणीय व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी विज्ञान, संशोधन, समाजसेवा, उद्योजकता आणि संस्कृती या साऱ्यांचा सुरेख संगम घडवून एक नवा पथदर्शी आदर्श घालून दिला आहे. या आठवड्यात येणाऱ्या रक्षाबंधन या सणाचे औचित्य साधून आयुर्वेदिक व नॅचरोपॅथी याचा अवलंब करून आरोग्याचे रक्षण करण्यासाठी एक पाऊल पुढे असणाऱ्या तन्वी हर्बल्सच्या या कुटुंबाप्रमाणेच आपण सगळ्यांनी आपल्या आरोग्याचे रक्षण करण्यासाठी कटिबद्ध होऊ या! त्यांच्या कार्याचा प्रकाश आयुर्वेदाच्या आकाशात सदैव तेजस्वी राहो, हीच शुभेच्छा!

Vaishu.gaikwad78@gmail.com

---



# जुळी गर्भधारणा आणि त्यातील आव्हाने

गर्भधारणा ही स्त्रीच्या आयुष्यातील एक विशेष टप्पा असतो. यामध्ये जुळी बाळ होणे म्हणजेच 'मल्टिपल प्रेग्नंसी' हा आणखी एक जटिल आणि लक्ष देण्याजोगा प्रकार आहे. सामान्यतः एका गरोदरपणात एकच भ्रूण वाढत असतो, पण काही वेळा दोन किंवा अधिक भ्रूण एकत्र विकसित होतात. जुळं किंवा त्याहून अधिक बाळं होणे हे नैसर्गिक किंवा उपचारांमुळे (जसे की IUI किंवा IVF) शक्य होते. जुळी गर्भधारणा ही एक 'हाय रिस्क प्रेग्नंसी' मानली जाते.

### जुळी गर्भधारणेची कारणे

- उमेद वाढवणारी औषधे (Ovulation-inducing drugs): ही औषधे अंडी तयार करण्याची प्रक्रिया वाढवतात, त्यामुळे एकापेक्षा अधिक अंडी तयार होऊ शकतात.

- इन विट्रो फर्टिलायझेशन (IVF): यात अनेक भ्रूण गर्भाशयात टाकले जातात, त्यामुळे जुळे किंवा त्याहून अधिक गर्भ होण्याची शक्यता वाढते.

- वय आणि अनुवांशिकता: ३० वर्षांपेक्षा अधिक वयात आणि कुटुंबात जुळं होण्याचा इतिहास असल्यास शक्यता वाढते.



स्त्री आरोग्य
डॉ. स्नेहल पाटील

### जुळी गर्भधारणेतील शारीरिक आव्हाने

**१. उलट्या व मळमळ वाढणे**

जुळं असल्याने गर्भस्रावाची पातळी अधिक असते. त्यामुळे मळमळ, उलट्या आणि अशक्तपणा जास्त प्रमाणात जाणवतो.

**२. अत्याधिक वजन वाढ**

सामान्य गर्भधारणेपेक्षा वजन अधिक प्रमाणात वाढते. यामुळे पाठदुखी, सांधेदुखी आणि चालण्यात अडचणी निर्माण होतात.

**३. हाय ब्लडप्रेशर (गेस्टेशनल हायपरटेन्शन)**

जुळी प्रेग्नंसीमध्ये प्रीक्लॅम्प्सिया होण्याचा धोका दुप्पट होतो. त्यामुळे डॉक्टरांनी रक्तदाबावर सतत लक्ष ठेवणे गरजेचे असते.


**४. गेस्टेशनल डायबेटीस**

मधुमेह होण्याची शक्यता अधिक असल्याने वेळोवेळी ब्लड शुगर तपासणे आवश्यक असते.

**५. लवकर प्रसूतीचा धोका (Preterm labor)**

जुळी गरोदरपणात ३७ आठवड्यांपूर्वीच प्रसूती होण्याची शक्यता अधिक असते. त्यामुळे नवजात बालकांना NICU मध्ये ठेवावे लागते.

### मानसिक आणि भावनिक आव्हाने




भीती व चिंता : बाळे आरोग्यदायी वाढतील की नाही, लवकर डिलिव्हरी होईल का, बाळांचे वजन योग्य असेल का, अशा अनेक चिंता आईला सतावत असतात.

भावनिक अस्थिरता : हार्मोनल बदलांमुळे तणाव, चिडचिड आणि नैराश्याची भावना अधिक जाणवते.

### वैद्यकीय आव्हाने

**१. ॲनिमिया (रक्तअल्पता)**

दोन बाळांची वाढ होत असल्याने शरीरातील लोहाची गरज वाढते. त्यामुळे ॲनिमिया होण्याचा धोका जास्त असतो.

**२. प्लेसेंटा संबंधित गुंतागूंत**

प्लेसेंटा प्रिव्हिया किंवा ॲब्रप्शन सारख्या समस्यांचा धोका वाढतो.

**३. डिलिव्हरीची गुंतागूंत**

जुळं असल्याने सामान्य प्रसूती शक्य नसेल, तर सिझेरियन करावी लागते. कधी कधी एक बाळ नॉर्मल डिलिव्हरीने आणि दुसरे सिझेरियननेही होते.

### जुळ्या गर्भधारणेची निगा राखताना घ्यावयाची काळजी

**नियमित तपासण्या :** सोनोग्राफी, रक्ताचे तपासण्या वेळेवर करणे अत्यंत आवश्यक आहे.

**संतुलित आहार :** प्रोटीन, लोह, कॅल्शियम यांचा योग्य समावेश असावा.

**पुरेशी विश्रांती :** शरीरावर ताण येऊ नये म्हणून भरपूर झोप आणि आराम घेणे आवश्यक आहे.

**डॉक्टरांचा सल्ला वेळोवेळी घेणे :** त्रास जाणवताच तज्ज्ञांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.

### निष्कर्ष

जुळी गर्भधारणा ही एक अद्भुत अनुभव असला तरी त्यात अनेक वैद्यकीय आणि मानसिक आव्हाने असतात. त्यामुळे जुळ्या गर्भधारणेच्या काळात योग्य वैद्यकीय देखरेख, आहार, विश्रांती आणि भावनिक आधार आवश्यक आहे. डॉक्टरांच्या मार्गदर्शनाने व संपूर्ण काळजीने अशी गर्भधारणा यशस्वी आणि सुरक्षितपणे पूर्ण करता येते. आई आणि बाळांची सुरक्षितता हेच यामधील मुख्य उद्दिष्ट असते.

drsnehalspatil@gmail.com

---



# सात कप्पे घावण - पारंपरिक गोडीची सातपट गोडी

नारळी पौर्णिमेचा सण म्हणजे समुद्रदेवतेस अर्पण, आणि गोड पदार्थांनी घरातील आनंद द्विगुणित करण्याचा दिवस. अशा वेळी आपल्या कोकणात बनणारा एक खास पदार्थ म्हणजे सात कप्पे घावन. नारळ, गूळ आणि वेलचीच्या संगमातून तयार होणारे हे घावन, सात थरांत घडी घालून बनवले जाते जणू गोडीच्या सात कुंडल्या! प्रत्येक थर गोडसर आठवणींसारखा जपून ठेवावा असा.

साहित्य : तांदळाचे पीठ : २ वाटी
गूळ : दीड वाटी
किसलेला ओला नारळ : २ वाटी
वेलची पूड : अर्धा टीस्पून
सुकामेवा भरड, पाणी : आवश्यकतेनुसार
तूप किंवा तेल : भाजण्यासाठी

कृती : १. घावनसाठी पीठ तयार करणे: तांदळाचे पीठ पाणी घालून डोशाच्या पिठासारखे भिजवून ठेवा. हे पीठ एकसंध आणि थोडे सैलसर असावे.

२. गोड सारण (पुरण) तयार करणे : एका कढईत गूळ, किसलेला नारळ, सुक्या मेव्याची भरड आणि वेलची पूड घालून मध्यम आचेवर गरम करा. सतत हलवत राहा, जेणेकरून गूळ सगळ्या नारळात मुरेल. मिश्रण कोरडे होईपर्यंत परतून घ्या. पुरण तयार आहे.

३. घावन तयार करणे :
गरम तव्यावर थोडे तेल/तूप घालून पसरवा.
त्यावर एक पातळ घावन पिठाचे थर पसरवा (डोशासारखे), झाकण ठेवून एक बाजू भाजा. भाजले की, त्यावर २ चमचे गोड सारण ठेवा आणि अर्धचंद्राकार घडी घाला.

४. सात कप्प्यांची प्रक्रिया :
अर्ध्या भागावर पुन्हा थोडे पीठ पसरवा, आणि त्यावर सारण ठेवा. हे नवीन थर, आधीच्या घावनावर पलटवा. पुन्हा रिकाम्या बाजूवर पीठ पसरवा, त्यावर सारण ठेवा. हेच सात वेळा करा. प्रत्येक वेळेस अर्ध्या भागावर पीठ व सारण घालून पलटवणे.
प्रत्येक थरावर थोडे तूप बाजूंनी सोडत राहा, जेणेकरून सगळे थर छान खरपूस होतील.



सुग्रास सुगरण
गायत्री डोंगरे

टीप : तवा नॉनस्टिक असेल तर उत्तम, आणि मध्यम आचेवर भाजल्यास कुरकुरीत घावन मिळेल.
सात वेळा ही प्रक्रिया पूर्ण केल्यावर "सात कप्पे घावन" तयार!
कसे वाढाल :
गरम गरम घावन नारळाच्या चटणीसोबत किंवा तसंच खाल्लं तरी अप्रतिम लागते.

---

# अंतरंगयोग - धारणा



मागील तीन लेखांमध्ये आपण त्राटकाविषयी जाणून घेतलं. त्राटक ही एक शुद्धिक्रिया आहेच पण त्याचबरोबर प्रत्याहार ही अष्टांग योगातील पायरी साधण्याचं ते एक साधनही आहे. लेख क्रमांक २८ मध्ये म्हटल्याप्रमाणे पतंजलींच्या योगातील आठ पायऱ्यांपैकी प्रत्याहार म्हणजे बहिरंगयोग आणि अंतरंगयोगाला जोडणारा सेतू आहे. प्रत्याहारानं पंचज्ञानेंद्रियं, पंचकर्मेंद्रियं यांच्यावर नियंत्रण आणता येतं. इंद्रियांमागे धावणाऱ्या मनाला इंद्रियांपासून जाणीवपूर्वक वेगळं करता येतं. बहिर्मुख असलेल्या मनाला अंतर्मुख करण्याची सुरुवात प्रत्याहार या पायरीने होते. प्रत्याहाराविषयी आणि प्रत्याहार साधण्याच्या साधनांविषयी सविस्तर जाणून घेतल्यावर आता अंतरंगयोगाच्या प्रदेशात आपण प्रवेश करणार आहोत.

प्रत्याहारानंतर धारणा, ध्यान आणि समाधी ही तीन अंगं अथवा पायऱ्या अंतरंगयोगात मोडतात. यांपैकी धारणा या पायरीविषयी प्रस्तुत लेखात जाणून घेऊ.

**धारणेच्या व्याख्या व स्वरूप :**

पतंजलींनी धारणा या अंतरंगयोगातील अंगाची व्याख्या 'देशबंधश्चित्तस्य धारणा' अशी दिली आहे. याचा अर्थ 'चित्ताला कोणत्यातरी एका स्थानावर बांधून ठेवल्याप्रमाणे स्थिर करणे म्हणजे धारणा होय.' प्रत्याहाराच्या योगे मनाला इंद्रियांच्या मागे धावण्यापासून थांबवलं जातं आणि अंतर्मुख केलं जातं. अशा अंतर्मुख केलेल्या चित्तातील सर्व विचारप्रवाह एका जागी स्थिर करणं म्हणजे धारणा.

जागृत अवस्थेमध्ये विविध क्रिया शरीरानं करत असताना आपलं चित्त त्या त्या ज्ञानेन्द्रिय आणि कर्मेंद्रियांबरोबर सर्वत्र संचार करत असतं. जसे डोळे पाहत असताना मन डोळ्यांसहित असतं त्यामुळेच आपण डोळ्यांसमोरील वस्तू पाहू शकतो. हेच ऐकणं, स्पर्शानं एखादी गोष्ट जाणणं इत्यादी बाबतीतही दिसून येतं. तसेच मनाचं साहाय्य असल्याशिवाय आपण शारीरिक क्रियाही करू शकत नाही हा प्रत्येकाचा अनुभव आहे. थोडक्यात सांगायचं तर जागृत अवस्थेत पाच ज्ञानेन्द्रियं आणि कर्मेंद्रियं यांच्यासह मन सदैव संचार करत असतं. अशा सतत संचार करणाऱ्या चित्ताला जाणीवपूर्वक, प्रयत्नांनी शरीरातील एखाद्या भागावर अथवा आपल्याला इष्ट असणाऱ्या एखाद्या विषयावर केंद्रित करणं जणू बांधून ठेवणं म्हणजे धारणा.

महाभारतात द्रौपदी स्वयंवराच्या प्रसंगी अर्जुनानं माशाचं पाण्यातील प्रतिबिंब बघून बाणानं फिरत्या माशाच्या डोळ्याचा वेध घेतल्याची कथा आपल्याला माहीतच आहे. ही एक प्रकारची धारणाच होय. मात्र ही धारणा बाह्य विषयावर केली आहे म्हणजेच बहिर्मुख आहे.

अशीच धारणा जेव्हा सर्व इंद्रियं आवरून अंतर्मुख होऊन केली जाते केली जाते तेव्हा तिला पातंजलयोगानुसार धारणा म्हटले आहे. एकूण धारणा म्हणजे चहूबाजूला विखुरलेल्या विचारांनी युक्त असे मन, विचारांना एकाच विषयाकडे प्रवाहित करून बांधून ठेवणं.

अशारीतीने मनाला इष्ट विषयावर प्रयत्नपूर्वक केंद्रित करताना ठरवलेल्या इष्ट ध्येयवस्तूविषयी अनेक विचार सतत मनात डोकावतात. त्यांना रोखायचा प्रयत्न केला तर ते अधिक जोरानं परत परत येत राहतात. पण म्हणून त्यांना प्रतिबंध करू नये. त्यांच्याकडे लक्ष देता देताच मूळ धारणेच्या विषयाचं भान ठेवावं आणि मूळ विषयावरची धारणा चालू ठेवावी. सरावानं आणि सातत्यानं हे इतर विचार येणं आपोआपच थांबतं.

काही विद्वानांच्या मते धारणेचा विषय ओंकार, एखादी मूर्ती, वस्तु, फूल, चिन्ह इत्यादी कोणताही असू शकते. तर काही विद्वानांच्या मते आपल्या शरीरातीलच एखाद्या भागावर जसे हृदय किंवा भुवयांचा मध्यबिंदू यावर चित्त स्थिर ठेवण्याचा प्रयत्न करावा. प्राचीन काळातील टीकाकारांनी आपल्या इष्टदेवतेवर धारणा करावी असं म्हटलं आहे.

ध्येयवस्तू कोणतीही असो त्यावर चित्त स्थिर रहाणं हा धारणेचा मुख्य उद्देश आहे. धारणेचा सतत अभ्यास केल्यानं अशी स्थिती येते की धारणा सिद्ध झालेला मनुष्य जगातील सर्व नित्यनैमित्तिक व्यवहार करत असला तरी त्याचं चित्त मात्र ध्येयवस्तूवर नित्य स्थिर झालेलं असतं.



मी योगिनी
डॉ. वैशाली दाबके

**धारणेचे लाभ :**

१. धारणेमुळे चित्ताची एकाग्रता पुष्कळ वाढते. याचा स्वाभाविक परिणाम म्हणजे कोणत्याही विषयाचं आकलन, मग तो विषय अगदी सूक्ष्म असला तरीही सहज होते.

२. मन अधिकाधिक स्थिर होतं त्यामुळे मनःशांतीचा अनुभव येऊ लागतो. धारणेच्या सरावाने चित्त जास्त वेळ एकाच विषयावर केंद्रित करणंही शक्य होतं.

३. योगसाधकांच्या दृष्टीनं धारणेमध्ये स्थिर होणं ही ध्यानाची पूर्वावस्था असते. धारणेमध्ये दीर्घकाळ स्थिर झाल्यावर खरं तर ध्यान आपोआप लागते.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे विचार आचरणात आणल्यास जीवनाचे कल्याण होईल-डॉ. सत्यभामा चोले

**बीड (प्रतिनिधी):-** जन शिक्षण संस्थान व जिल्हा कारागृह बीड यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ. बाबासाहेब अबिडकर यांची १३५ वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जन शिक्षण संस्थान बीडच्या उपाध्यक्षा डा. सत्यभामा चोले या होत्या. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सामान्य माणसाला हक्क आणि कर्तव्याची जाणीव करून दिली. त्यांचे चरित्र प्रेरणादायी असून, ते आचरणात आणले तर गुन्हेगारी प्रवृत्ती नष्ट होईल. विशेषतः तरुणांनी महापुरुषांचे विचार वाचले आणि आत्मसात केले, तर त्यांच्यावर कारागृहात येण्याची वेळ येणार नाही, असे बंदी जणांना उद्देशून त्या म्हणाल्या.



या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती डॉक्टर सत्यभामा चोले, जन शिक्षण संस्थान बीडचे संचालक गंगाधर देशमुख, व्याख्याते म्हणून अजिंक्य चांदण, जिल्हा कारागृह अधीक्षक रामराजे चांदणे, कार्यक्रम अधिकारी सीमा मनूरकर, बरिष्ठ तुरुंग अधिकारी खैरे, तुरुंग अधिकारी धीरज कुमार रुकम, सहायक कार्यक्रम अधिकारी सुदाम पालकर, धर्मराज जाडकर याची प्रमुख उपस्थिती व्याख्याते अजिंक्य चांदणे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कष्टमय शालेय जीवनापासून ते भारतीय राज्यघटनेच्या निर्मितीपर्यंतचा प्रवास उलगडून दाखवला. त्यांनी घटनेने दिलेले हक्क आणि नागरिकांची कर्तव्ये यावर सविस्तर मार्गदर्शन के ले. जन शिक्षण संस्थानचे संचालक गंगाधर देशमुख यांनी डॉ. बाबासाहेब आबेडकराच्या शैक्षणिक कार्यावर प्रकाश टाकला. कौशल्य शिक्षणातून स्वावलंबन कसे साध्य करता येते, हे सांगताना त्यांनी दीनदयाल शोध संस्थान आणि जन शिक्षण संस्थान बीडच्या उपक्रमांची माहिती दिली. जन शिक्षण संस्थान बीडच्या वतीने जिल्हा कारागृहातील ६० कैदी बांधवांना हेल्पर वायरमन चे प्रशिक्षण देण्यात आले असून त्याचे प्रमाणपत्र मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

## विशेष वृत्त

### दिव्यांगाने शाळेला दिला ग्रामनिधी; सारणी येथील जाधव यांच्या मनाचा मोठेपणा



**केज (प्रतिनिधी):** ग्रामपंचायतीला मिळालेल्या निधीतून दिव्यांगांना ग्रामनिधी दिला जातो. सारणी येथे सदरील निधीचे वाटप दिव्यांगांना करण्यात आले. यानंतर मिळालेला निधी दिव्यांगांने स्वतसाठी न वापरता तो शाळेच्या विकासासाठी देवून मनाचा मोठेपणा दाखवून दिला आहे. केज तालुक्यातील सारणी (सांगवी) येथे दि.१४ एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यामध्ये विविध सामाजिक उपक्रम घेण्यात आले. तसेच काही दिव्यांग नागरिकांना ग्रामनिधीचे वाटप सरपंच शिला राहुल ओव्हाळ यांच्या मार्फत करण्यात आले. याच दिव्यांगापैकी गावातील शंकर जाधव यांनी स्वतःला आलेला संपूर्ण ग्रामनिधी गावातील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेसाठी आर्थिक मदत म्हणून रोख स्वरूपात दिला. या त्यांच्या मदतीमुळे शाळेला नक्कीच फुल नाही, फुलाची पाकळी मदत झाली, असे मुख्याध्यापक मोहन ढाकणे यांनी यावेळी बोलताना सांगितले. तसेच आपला हा निधी गावाच्या शैक्षणिक विकासासाठी देत असल्याचा मला आनंद होत असल्याचे शंकर जाधव यांनी सांगितले.

### मुस्लिम आरक्षण मोर्चास उपस्थित रहावे : पठाण

**मानूर (प्रतिनिधी) :** मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक हक्कांसाठी सकल मुस्लिम आरक्षण कृती समितीच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला अभूतपूर्व प्रतिसाद मिळत असून, जिल्हाभरातून मोठ्या प्रमाणात जनसागर उसळणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे. राज्य शासनाने रद्द केलेल्या ५ टक्के मुस्लिम आरक्षणाच्या निषेधार्थ हा मोर्चा येत्या १७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकणार आहे. या मोर्चात जिल्ह्यातील विविध तालुक्यांतून हजारी नव्हे तर लाखो समाजबांधव सहभागी होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले आहे. विशेषत तरुणाई, विद्यार्थी आणि जेष्ठ नागरिक यांचा उत्स्फूर्त सहभाग लक्षवेधी ठरणार आहे. मोर्चात सहभागी होणार आंदोलनकर्ते हातात फलक, बनर घेत शांतपने आपल्या हक्कासाठी आवाज उठवणार आहेत. या मोर्चात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन अरबाज पठाण यांनी केले आहे.

### डोंगरकिन्ही येथे गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार

**जाटनांदूर (प्रतिनिधी):** पाटोदा तालुक्यातील डोंगरकिन्ही येथील जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेत भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती अत्यंत उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने आयोजित 'डोंगरकिन्ही पॅटर्न – शोध गुणवंतांचा' या केंद्रस्तरीय स्पर्धा परीक्षेत दैदिप्यमान यश मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांचा बक्षीस वितरण सोहळा आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाची सुरुवात महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करून करण्यात आली. यावेळी सरपंच आण्णासाहेब येवले, डॉ. इकबाल पठाण, सय्यद रौफभाई, केंद्रप्रमुख शमीमबानो पठाण आणि जयंती उत्सव समितीचे पदाधिकारी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. स्पर्धा परीक्षेत इयत्ता तिसरीच्या गटात वेदिका प्रशांत येवले (प्रथम), शिवराज अंबादास येवले (द्वितीय), तेजल ज्योतीराम सातपुते (तृतीय) तर सुहानी संभाजी येवले व साद वाजिद शेख (उत्तेजनार्थ) यांनी यश मिळवले. चौथीच्या गटात समृद्धी कल्पना अमोल खाकरे (प्रथम), धनश्री पूजा मधुकर येवले (द्वितीय) आणि वेदिका पूजा विकास येवले (उत्तेजनार्थ) यांचा मान्यवरांच्या हस्ते रोख रक्कम, सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरव करण्यात आला.

### माजलगावला क्रीडा महोत्सवात क्रिकेट स्पर्धा ठरली प्रमुख आकर्षण

**माजलगाव (प्रतिनिधी):** येथील जिजामाता फिजिओथेरपी महाविद्यालयात आयोजन; 'डॉमिनेटर्स' संघाने मिळविले विजेतेपद जिजामाता फिजिओथेरपी महाविद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक क्रीडा महोत्सवाने विद्यार्थ्यांच्या उत्साहाला उधाण आले. या क्रीडा महोत्सवातील क्रिकेट स्पर्धा विशेष आकर्षण ठरली.अंतिम सामन्यात तृतीय वर्षाच्या

'डॉमिनेटर्स' संघाने प्रथम वर्षाच्या 'रॉयल' संघावर ८ गडी राखून दणदणीत विजय मिळवत विजेतेपद पटकावले. प्रथम फलंदाजी करताना रॉयल संघाने १० षटकांत ४९ धावांचे आव्हान उभे केले. त्यांच्या सलामीवीराने चांगली फलंदाजी केली असली तरी तृतीय वर्षाच्या गोलंदाजांनी अचूक मारा करत धावसंख्येवर नियंत्रण मिळवले. प्रत्युत्तरात डॉमिनेटर्स संघाने आक्रमक फलंदाजी करत चौकार-षटकारांची बरसात केली आणि अवघ्या सहा षटकांत विजय संपादन केला. अविले प्रथमेश याने ४ गडी बाद करत सामन्याचा 'सामनावीर' ठरला. इतर स्पर्धांमध्येही विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कामगिरी केली. मुलांच्या क्रिकेटमध्ये डॉमिनेटर्स संघ विजयी ठरला, तर मुलींच्या क्रिकेटमध्ये रॉयल संघाने बाजी मारली. व्हॉलीबॉलमध्ये थंडर संघाने, थ्रो बॉलमध्ये तनवीर पठाण हिने, बुद्धिबळ स्पर्धेत रोहित शेटे व किरण लिंगाळे यांनी, कॅरममध्ये अरमान मुर्शद व सानिका वाघमारे यांनी, तर बॅडमिंटनमध्ये शिवानी सोसे, अलिशा शेख तसेच अरमान मुर्शद व मनोज गड़ें यांनी यश संपादन केले. या प्रसंगी दीपक माने, प्राचार्य डॉ. पॉल राज, प्राचार्य विनोद कुमार यांनी विद्याथ्यर्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी कार्यालय अधीक्षक वाघ, शिंदे, इरफान पठाण तसेच सर्व शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

### सौर कृषीपंप लाभार्थ्यांसाठी तक्रार निवारण मेळावा

**बीड (प्रतिनिधी):-** सौरकृषीपंपाबाबत येत असलेल्या तक्रारींच्या अनुशंगानें लाभार्थी शेतकऱ्यांच्या सौरकृषीपंपाबाबत असलेल्या विविध तक्रारींची दखल घेत महावितरणे गुरूवार (दि.१६ एप्रिल ते २० एप्रिल) पासून उपविभागीय कार्यालय स्तरावर तक्रार निवारण मेळाव्याचे आयोजन केले आहे. सौरकृषीपंपाबाबत तक्रार असलेल्या लाभार्थ्यांनी याच लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

बीड विभागांतर्गत येणाऱ्या आष्टी, शिरूर कासार, पाटोदा व गेवराई या उपविभागांमध्ये गुरूवारी (दि.१६ एप्रिल) उपविभागीय कार्यालयात सौरकृषीपंपाबाबतच्या तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. तसेच आंबाजोगाई व बीड विभागातील माजलगाव, तेलगाव, बीडशहर व बीड ग्रामीण उपविभागात शुक्रवारी (दि.१७एप्रिल) तर आंबाजोगाई विभागातील आंबाजोगाई शहर, आंबाजोगाई उपविभाग क्रमांक १, आंबाजोगाई उपविभाग क्रमांक २, परळी व केज या उपविभागीय कार्यालयात सोमवारी (दि.२० एप्रिल) तक्रारी जाणून घेवून त्याचे निवारण केले जाणार आहे. दि. १६ ते २० एप्रिल दरम्यान आयोजीत तक्रार निवारण मेळाव्यास लाभार्थी सौकृषीपंप धारक शेतकऱ्यांनी कार्यालयीन वेळेत उपस्थित रहावे. सौकृषीपंपाबाबतच्या तक्रारींचे निवारण करण्यासाठी उपविभागीय अधिकारी, शाखा प्रमुख व सौरकृषीपंप एजन्सीचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. शक्य तेवढ्या तक्रारिंचे निवारण जागेवरच होणार असल्याने वीजग्राहकांनी याचा लाभ घ्यावा असे आवाहन महावितरणने केले आहे.

# संतांची सेवा करणारे देवाला प्राणापेक्षाही जास्त आवडतात

## सुरेश महाराज जाधव: श्रीक्षेत्र चाकरवाडीत संत बाळनाथ महाराजांचा पुण्यतिथी सोहळा

**बीड (प्रतिनिधी):-** संत सज्जनांचे नामस्मरण केले असता पुण्यवंत होऊन पापाचा नाश होतो. त्यामुळे दादा माऊली सारख्या संतांचे नामस्मरण करा पुण्य फळ पदरात पडेल असे प्रतिपादन सुरेश महाराज जाधव यांनी केले. श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे संत बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात पहिल्या दिवसाचे किर्तन पुष्प गुंफताना ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थिती महादेव महाराज चाकरवाडीकर, पोलीस पाटील नानासाहेब काकडे, पत्रकार अभिजीत पवार, प्रशांत महाराज क्षीरसागर, नवनाथ महाराज गिरी, शंकर महाराज, अमोल महाराज पवार, अवि महाराज क्षीरसागर, रमेश महाराज पिंपळे, महादेव महाराज रोडे यांच्यासह हजारो भाविक भक्तांचे उपस्थिती होती. बीडच्या श्रीक्षेत्र चाकरवाडी येथे श्री गुरु चैतन्य बाळनाथ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त भव्य अखंड हरिनाम सप्ताह सुरु आहे. या सप्ताहातील पहिल्या दिवसाची कीर्तन सेवा सुरेश महाराज जाधव यांची झाली. तुकाराम महाराजांच्या अभंगावर चिंतन करतांना महाराज म्हणाले की, मानवी जीवनामध्ये काही आवश्यक गोष्टी आणि काही



अनावश्यक गोष्टी आहेत. आवश्यक गोष्टी माणसाने मिळवल्या पाहिजेत तर अनावश्यक गोष्टीचा त्याग केला पाहिजे. परिंदा, परद्रव्य आणि परस्त्री मानवी जीवनामध्ये अनावश्यक आहे. भेजस, भुवन, भोजन, भजन, भय मानवी जीवनात आवश्यक आहे. देवाच्या भजना बरोबरच वारकरी संप्रदायात साधू संतांच्या सेवेलाही अनन्यसाधारण महत्त्व दिले आहे. देव स्वतः संतांची सेवा करायला सांगतो. संतांची सेवा करतात ते देवाला प्राणापेक्षाही जास्त आवडतात. त्यामुळे संत सज्जनांच्या नामाचे स्मरण केले असता पुण्यवंत होता येतं, फुकासाठी लाभ जोडला जातो, आणि विश्रांती जर हवी असेल तर संतांच्या चरणा जवळच आहे, त्यासाठी संतचरणजवळ भावः ठेवावा. असेही महाराजांनी सांगितले.

# क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांना जयंतीनिमित्त डॉ.बाबासाहेब आंबेडकर



**बीड (प्रतिनिधी):-** येथील आनंद मागासवर्गीय शिक्षण प्रसारक मंडळ बीड संचलित डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यालयामध्ये सत्यशोधक समाजाचे संस्थापक, स्त्री शिक्षणाचे जनक क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन कार्यक्रम सेवानिवृत्त ज्येष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी तुकाराम पवार यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये आणि शाळेचे मुख्याध्यापक बी.ए. हावळे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या प्रारंभी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले व भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले याप्रसंगी प्रमुख पाहुणे व शाळेचे मुख्याध्यापक बी.ए.हावळे यांनी क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचा इतिहास व त्यांच्या जीवना विषयी सखोल मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाचे संचलन य.बी.पवळ, प्रास्ताविक संतोष मेश्राम आणि आभार प्रदर्शन डब्ल्यू.एस.वाघमारे यांनी केले. या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आर.बी. घुले व श्रीमती एन.जी.मुंडे, सय्यद ए.एन या सर्वांनी प्रयत्न केले. याप्रसंगी आनंद छात्रालयाचे अधीक्षक डी.व्ही. खरसाडे, शिक्षकेतर कर्मचारी एस.एस.गायकवाड, भारत कोळेकर, श्रीमती एन.पी. गायकवाड व बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते.

### माजलगावमध्ये रस्त्यालगत खोदलेला खड्डा ठरतोय अपघाताला कारणीभूत

**माजलगाव (प्रतिनिधी)**शहरातील बीड रोडवरील अकोलकर हॉस्पिटल परिसरात गेल्या सहा महिन्यांपासून खोदून ठेवलेला मोठा खड्डा नागरिकांच्या जीवाशी खेळ करत असल्याचे चित्र समोर आले आहे. पावसाळ्यात साचणारे पाणी बाहेर काढण्यासाठी नगरपरिषदेकडून हा खड्डा खोदण्यात आला होता. मात्र आजपर्यंत तो बुजवण्यात आलेला नसल्याने परिसरातील नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

या खड्ड्यात पावसाचे पाणी साचून राहिल्याने डासांची उत्पत्ती वाढली असून रोगराई पसरण्याचा धोका निर्माण झाला आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी अकोलकर हॉस्पिटल तसेच प्रसूतीगृह व बाल रुग्णालय असल्याने रुग्ण आणि त्यांच्या नातेवाईकांच्या आरोग्यावर याचा गंभीर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. दरम्यान, या खड्ड्यामुळे अनेक अपघातही घडले आहेत. रात्रीच्या वेळी प्रकाश व्यवस्था अपुरी असल्याने पादचारी आणि दुचाकीस्वारांना खड्डा दिसत नाही. त्यामुळे अनेकजण या खड्ड्यात पडल्याच्या घटना घडल्या असून सुदैवाने मोठी दुर्घटना टळली असली तरी परिस्थिती अत्यंत धोकादायक बनली आहे. स्थानिक नागरिकांनी वारंवार नगरपरिषदेकडे तक्रारी करूनही अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात आलेली नाही. त्यामुळे संतप्त नागरिकांनी तात्काळ खड्डा बुजवण्याची मागणी केली असून अन्यथा नगरपरिषदेसमोर आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.

# स्वामी विवेकानंद एज्युकेशनल अकॅडमीचे विद्यार्थी राज्य पातळीवर चमकले

**बीड (प्रतिनिधी):** अक्षरगंगा पब्लिकेशन, सांगली यांच्यावतीने आयोजित करण्यात येणारी अक्षरगंगा प्रज्ञाशोध परीक्षा ही एक लोकप्रिय शालेय स्पर्धा परीक्षा असून, नुकताच या परीक्षेचा निकाल जाहीर झाला आहे. या परीक्षेत स्वामी विवेकानंद एज्युकेशनल अकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश संपादन करत अकॅडमीचा लौकिक उंचावला आहे.

या परीक्षेत इयत्ता पहिलीतील देवांश भागवत याने राज्यात पाचवा क्रमांक मिळवत आपली गुणवत्ता सिद्ध केली. तसेच इयत्ता दुसरीतील गौरांग काकडे याने जिल्ह्यात प्रथम क्रमांक पटकावत उल्लेखनीय कामगिरी केली. इयत्ता









तिसरीतील वेदिका देशमाने हिने केंद्रात प्रथम क्रमांक मिळवून विशेष यश संपादन केले, तर इयत्ता चौथीतील स्वरा खवले हिने केंद्रात द्वितीय क्रमांक पटकावत आपली गुणवत्ता अधोरेखित केली. या घवघवीत यशानिमित्त अकॅडमीत गुणवंत विद्यार्थ्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी अकॅडमीच्या वतीने सर्व विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करण्यात आले तसेच अकॅडमीचे सर्व संचालक यांनी विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे पालकांमध्येही आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, पालकांकडून विद्यार्थ्यांवर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे. विद्यार्थ्यांची जिद्द, परिश्रम, शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचा भक्कम पाठिंबा यामुळेच हे यश शक्य झाल्याचे अकॅडमीतर्फे सांगण्यात आले. अशा स्पर्धा परीक्षांमुळे विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वृद्धिंगत होऊन त्यांच्या बौद्धिक विकासास चालना मिळते, असे मतही यावेळी व्यक्त करण्यात आले.

# कडक उन्हात ना.पंकजाताई मुंडे चार दिवस विदर्भ दौऱ्यावर ;पशु चिकित्सालयाचे केळझर येथे भूमिपुजन

# पशुपालक व शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत घेतला आढावा



वर्धा (सरकार) कडक उन्हामुळे एकीकडे अंगाची लाही लाही होत असताना अशा वातावरणात राज्याच्या पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे मात्र पशूपालकांसाठी सरसावल्या आहेत. आजपासून चार दिवस त्या विदर्भ दौऱ्यावर असून आज त्या वर्धा इथे होत्या.

जिल्ह्यातील काही भागात उन्हाळ्याच्या दिवसांमध्ये पाणी आणि चाऱ्याअभावी काही पशुपालक आपल्या पशुंचे स्थलांतरण करीत असल्याचे येथे आल्यानंतर समजले. हे स्थलांतरण थांबविण्यासाठी पशुपालकांच्या गावाशेजारीच पाण्याची उपलब्धता असलेल्या भागात कायमस्वरुपी पाणी आणि चारा उपलब्ध करून देणाऱ्या छावण्या लावण्यासाठी प्रयत्न करू, असे पशुसंवर्धन व पर्यावरण मंत्री पंकजाताई मुंडे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पशुपालक व शेतकऱ्यांच्या समस्यांबाबत आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्या बोलत होत्या. बैठकीला पालकमंत्री डॉ.पंकज भोयर, जिल्हाधिकारी वान्मथी सी, मुख्य कार्यकारी अधिकारी पराग सोमण, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ.जगदीश बुकतरे यांच्यासह पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय, कृषी व विविध विभागाचे अधिकारी उपस्थित होते. वर्धा जिल्ह्यात गवगाऊ ही उत्तम दर्जाची देशी गाय आहे. परंतू गेल्या काही वर्षात या गाईंची संख्या कमी होत आहे. या गाईचे संवर्धन होणे आवश्यक असल्याचे मत पालकमंत्री डॉ.पंकज भोयर व काही पशुपालकांनी बैठकीत व्यक्त केले. या गाईच्या संवर्धनासाठी स्वतंत्र बैठक घेण्यात येईल. यासाठी काय धोरणात्मक निर्णय घेणे आवश्यक आहे, त्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे त्या म्हणाल्या. जिल्ह्यात पशुधन व दुग्धव्यवसाय वाढविण्यासाठी विविध विभागाच्या सहकार्याने चांगले काम करू, असे ही त्यांनी सांगितले.



## नवगण महाविद्यालयाच्या विद्यार्थिनीची महाराष्ट्र पोलीस पदावर निवड

परळी (सरकार) नवगण महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. शालू राठोड हिची महाराष्ट्र पोलीस दलात (परभणी जिल्हा पोलीस दल) निवड झाल्याबद्दल महाविद्यालयात तिचा सत्कार उत्साहात पार पडला. या यशामुळे महाविद्यालयाच्या नावलौकिकात भर पडली असून सर्वत्र आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ आबासाहेब हांगे उपप्राचार्य डॉ लालासाहेब घुमरे व प्राध्यापक वर्ग, मान्यवरांच्या उपस्थितीत शालू राठोड हिला पुष्पगुच्छ देऊन व शाल-श्रीफळ देत सन्मानित करण्यात आले. उपस्थित मान्यवरांनी तिच्या कठोर परिश्रम, चिकाटी आणि जिद्दीचे कौतुक करत इतर विद्यार्थ्यांसाठी ती प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

शालू राठोड हिने आपल्या यशाचे श्रेय आई-वडील, शिक्षक आणि मित्रपरिवार यांना दिले. तिने सातत्यपूर्ण अभ्यास, शिस्तबद्ध जीवनशैली आणि आत्मविश्वास यांच्या जोरावर हे यश मिळवले असल्याचे सांगितले. या कार्यक्रमाचे आयोजन क्रीडा विभागाचे डॉ उद्धव मुळे, डॉ सुदर्शन अवस्थी, डॉ अनुरथ चंदरे यांनी करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी शालू राठोड हिला पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

### डॉ.आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आयोजित दिव्यांग सहाय्यक पोर्टल मोफत नोंदणी शिबिराचे ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते उद्घाटन

## दिव्यांग सहाय्यक पोर्टल मधील नोंदणी २१ तारखेपर्यंत सुरू राहणार-डॉ.संतोष मुंडे

परळी (सरकार) भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त आयोजित दिव्यांग सहाय्यक पोर्टल मोफत नोंदणी शिबिराचे आज मौजे रामेवाडी येथील ज्येष्ठ नागरिक श्री बाबासाहेब उत्तमराव पौळ यांच्या हस्ते उद्घाटन संपन्न झाले.

याप्रसंगी प्रथम दिव्यांग सहाय्यक पोर्टल मोफत नोंदणी शिबिराचे मुख्य आयोजक महाराष्ट्र दिव्यांग कल्याण अभियानाचे उपाध्यक्ष डॉ.संतोष मुंडे तसेच विविध दिव्यांग संघटनांचे पदाधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रतिमेचे पूजन करून शिबिराचा प्रारंभ करण्यात आला.

दिव्यांगांना विविध योजनांचा लाभ मिळण्यासाठी तसेच भविष्यात मिळणाऱ्या भक्कम आर्थिक आधारासाठी या दिव्यांग सहायक पोर्टल मोफत नोंदणी शिबिराचे आयोजन महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण अभियानाचे उपाध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांनी केले आहे.



महाराष्ट्र राज्याचे माजी कृषिमंत्री आ.धनंजय मुंडे तसेच मा.ना.पंकजाताई मुंडे व दिव्यांग कल्याण मंत्रालयाचे मंत्री ना.अतुल सावे यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांगांच्या कल्याणासाठी प्रत्येक क्षणी प्रथम प्राधान्याने प्रयत्न करणारे तसेच विविध सामाजिक कार्यात सातत्याने अग्रेसर राहून विविध आरोग्य शिबिरे व दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबवणारे दिव्यांगांचे कैवारी अशी ओळख असणारे महाराष्ट्र राज्य दिव्यांग कल्याण अभियानाचे उपाध्यक्ष तथा धनंजय मुंडे आरोग्य मित्र योजनेचे अध्यक्ष डॉ संतोष मुंडे यांच्या प्रयत्नातूनच या शिबिराचे आयोजन करण्यात आलेले आहे ज्यामुळे दिव्यांगांच्या जीवनात एक भक्कम आर्थिक आधार मिळणार आहे.

अशा या दिव्यांग सह्यायक पोर्टल मधे दिनांक १४ एप्रिल ते २१ एप्रिल या कालावधीमध्ये दिव्यांग बांधवांची नोंदणी करून घेण्यात येणार आहे आणि शिबिराच्या पहिल्याच दिवशी मोठ्या संख्येने दिव्यांग बांधवांनी पोर्टल मध्ये आपली नोंदणी करून घेतली आहे.

दरम्यान शिबिरातील सहभागी दिव्यांना मार्गदर्शन करताना शिबिराचे मुख्य आयोजक डॉ. संतोष मुंडे यांनी या दिव्यांग सहाय्यक पोर्टल चे महत्व सांगितले तसेच ही नोंदणी २१ एप्रिल पर्यंत सुरू राहणार आणि दिव्यांग सहायक पोर्टल मधील नोंदणीपासून एकही दिव्यांग वंचित राहिला नाही पाहिजे असे आव्हानही केले या शिबिरांतर्गत दिव्यांग सहाय्यक पोर्टल मध्ये नोंदणी करणाऱ्या प्रत्येक दिव्यांग नागरिकाला विविध शिष्यवृत्ती योजना, सहाय्यक उपकरणे, स्वयंरोजगार कर्ज,प्रशिक्षण आणि रोजगार, आरोग्य विमा सुविधा तसेच महामंडळ योजना अशा विविध योजनांचा लाभ घेता येईल अशी माहिती प्रसार माध्यमांशी बोलताना देण्यात आली. दरम्यान ज्या दिव्यांग नागरिकांची या दिव्यांग सहाय्यक पोर्टल मध्ये नोंदणी होईल त्यांनाच भविष्यातील पंधरा हजार रुपये किमतीच्या साहित्य वाटपाचा आणि विविध योजनांचा लाभ घेता येईल अशीही महत्वाची सूचना देण्यात आली.

## बीड शहरात दलित पँथरच्या वतीने भीमजन्मोत्सव उत्साहात साजरा



बीड (सरकार): डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त बीड शहरात विविध जयंती उत्सव समित्यांच्या मिरवणुका मोठ्या उत्साहात पार पडल्या. या पार्श्वभूमीवर दलित पँथरच्या वतीने शहरातील सर्व जयंती उत्सव समित्यांचे सन्मानपत्र व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. या उपक्रमामुळे सामाजिक ऐक्य व परस्पर सन्मानाची भावना अधिक दृढ झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

दलित पँथरच्या कार्यकर्त्यांनी मिरवणुकीत सहभागी झालेल्या विविध मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सन्मानपत्र देऊन त्यांचे कौतुक केले. तसेच, कायदा व सुव्यवस्था सुरळीत राखण्यासाठी कर्तव्य बजावणाऱ्या पोलीस अधिकारी व पोलीस बांधवांचेही विशेष अभिनंदन करण्यात आले. यावेळी पत्रकार, संपादक बांधव आणि सामाजिक कार्यकर्त्यांचाही पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

हा संपूर्ण भीमजन्मोत्सव कार्यक्रम दलित पँथरचे बीड जिल्हाध्यक्ष भाई धम्मानंद वाघमारे तसेच युवा जिल्हाध्यक्ष भाई प्रेम कांबळे यांच्या मार्गदर्शनाखाली यशस्वीरीत्या पार पडला. त्यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी संघटितपणे काम करत कार्यक्रमाची प्रभावी अंमलबजावणी केली.या उपक्रमामुळे शहरात एक सकारात्मक संदेश गेला असून, समाजातील विविध घटकांमध्ये बंधुभाव आणि एकात्मतेची भावना अधिक बळकट झाली आहे. भविष्यातही अशा सामाजिक उपक्रमांद्वारे समाजप्रबोधनाचे कार्य अधिक जोमाने राबविण्यात येईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

## दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांचे सी.बी.एस.ई बोर्ड परीक्षेत घवघवीत यश

परळी (सरकार) दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिल्ली वर्ल्ड पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी सी.बी.एस.ई बोर्ड परीक्षेत नेत्रदीपक कामगिरी करून १००% निकालाची परंपरा कायम राखली आहे. फेब्रुवारी-मार्चमध्ये घेण्यात आलेल्या परीक्षेत दहावीतील ८५ विद्यार्थ्यांचा सहभाग होता. परळी तालुक्यातून सी.बी.एस.ई बोर्ड परीक्षेत यशराज बेंबलगे(९८%) या विद्यार्थ्याने प्रथम येऊन शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

सदरील परीक्षेत शाळेतील १५ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा जास्त मार्क्स मिळविले आहेत. यामध्ये यशराज बेंबलगे(९८%), रुद्राक्ष गुट्टे(९६%), वैष्णवी जाधव(९६%), तेजस्विनी गुट्टे(९५.६०%), श्रेयश बळवंत(९५.२०%),तन्मय बेंबलगे(९३.८०%), अमरनाथ कराड(९३.६०%), प्रथमेश लहाने(९२.८०%), अनुष्का नागरगोजे(९२.४०%), कपिल सावंत (९२.२०%), सार्थक केंद्रे (९१.८०%), वैष्णवी मुंडे(९१.४०%), अभिलाषा दहिवाळ (९१.२०%), नंदिनी चाटे (९०.६०%), आकांक्षा गुट्टे (९०.२०%)यांचा समावेश आहे. तसेच ८०% ते ९०% यादरम्यान२७ व ७०% ते ८०% यादरम्यान २५ विद्यार्थी आहेत. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल सर्वच स्तरातून कौतुकांचा वर्षाव होत आहे.

## डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या न.प. अधिकाऱ्यांना निलंबित करा:पप्पू कागदे

बीड (सरकार) भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती घाण पाणी सोडून डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर चर,खडी टाकून अनेक आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बीड नगर परिषद बांधकाम अभियंता किरण देशमुख व पाणीपुरवठा अभियंता प्रमोद माने यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. अशी मागणी युवा रिपाइंचे प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना निवेदन देऊन केली.



भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या जयंतीनिमित्त काढण्यात येणाऱ्या मिरवणूक मार्गावरती बारीक चर,खडी टाकून घाण पाणी सोडल्यामुळे खडीवरून घसरून अनेक महिला भगिनी, पुरुष व रिपाइंचे बीड शहराध्यक्ष अविनाश जोगदंड जबर जखमी झाले आहेत. ही बाब अत्यंत खेदजनक असून जयंती उत्सवाला गालबोट लावणारी आहे.

आंबेडकरांच्या मिरवणुकी दरम्यान रस्त्यावर घाण पाणी सोडून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा अवमान करणाऱ्या व रस्त्यावर बारीक चर,खडी टाकून आंबेडकरी अनुयायांना जखमी करण्यास कारणीभूत असलेल्या बांधकाम अभियंता किरण देशमुख, पाणी पुरवठा अभियंता प्रमोद माने व कर्मचारी यांना तात्काळ निलंबित करण्यात यावे. नसता बीड शहर रिपाइंच्या वतीने बीड नगर परिषदवर सोमवार दि. २० एप्रिल २०२६ रोजी तीव्र आंदोलन छेडण्यात येईल. असा इशारा युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे, राजू जोगदंड, प्रभाकर चांदणे, संभाजी गायकवाड, कपिल साळवे, विष्णू जोगदंड, तुषार जाधव, सिद्धिक फारोखी, के.के.कांबळे, भैय्यासाहेब वाघमारे आदींनी केले.

## जपानी मेंदूज्वराविरोधात महाराष्ट्र सतर्क लसीकरण मोहिमेला वेग-मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई (सरकार): जपानी मेंदूज्वरासारख्या संसर्गजन्य आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना, लसीकरण आणि जनजागृती यावर विशेष भर दिला जात आहे. जपानी मेंदूज्वर आजारावर नियंत्रण मिळवण्यासाठी राज्य शासन सतर्क असून लसीकरण मोहिमेला वेग देण्यात येत असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, नागरिकांच्या आरोग्याचे संरक्षण ही सरकारची सर्वोच्च प्राथमिकता आहे. सार्वजनिक आरोग्य यंत्रणांनी समन्वयाने काम करून या आजारावर प्रभावी नियंत्रण मिळवणे आवश्यक आहे. २०१५-१६ दरम्यान देशातील इतर राज्यांत जपानी मेंदूज्वरावरील लसीकरण मोहीम सुरू झाली होती. याच दरम्यान विदर्भातील काही जिल्ह्यांमध्ये जपानी मेंदूज्वराचे रुग्ण आढळले. मात्र, महाराष्ट्रात त्याची सुरुवात झाली नव्हती. ही बाब तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या लक्षात आली. त्यांनी त्यावेळी केंद्र सरकाराला विशेष विनंती केली आणि जपानी मेंदूज्वर आजारांवरील लसीकरण मोहीमेला राज्यात सुरुवात केली. या प्रयत्नांमुळे आज रुग्णसंख्या जवळपास शून्यावर आली आहे.

महाराष्ट्रात जपानी मेंदूज्वर या आजाराबाबत आरोग्य यंत्रणा सतर्क झाली असून लसीकरण व नियंत्रण उपाययोजनांना गती देण्यात आली आहे. हा आजार प्रामुख्याने डासांद्वारे पसरतो आणि मेंदूवर परिणाम करून गंभीर गुंतागुंत, झटके तसेच मृत्यू होण्याची शक्यता निर्माण करतो. या आजाराचा मृत्यूदर जास्त असून वाचलेल्या रुग्णांमध्ये न्यूरोलॉजिकल समस्या उद्भवू शकतात.



राज्यात २०२१ ते मार्च २०२६ या कालावधीत रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी काही जिल्ह्यांमध्ये काही प्रकरणे आढळली आहेत. २०२२ मध्ये २ रुग्ण, २०२३ मध्ये ५ रुग्ण, २०२४ मध्ये ५ रुग्ण व २ मृत्यू, २०२५ मध्ये ७ रुग्ण व १ मृत्यू नोंदविण्यात आले, तर २०२६ च्या मार्चपर्यंत एकही रुग्ण आढळलेला नाही. नागपूर, भंडारा, चंद्रपूर आणि गडचिरोली या विदर्भातील जिल्ह्यांमध्ये प्रामुख्याने रुग्ण आढळले आहेत.

एप्रिल २०२५ ते फेब्रुवारी २०२६ दरम्यान लसीकरण मोहिमेत राज्याने लक्षणीय प्रगती केली आहे. पहिल्या डोसचे एकूण कव्हरेज ८९.२६ टक्के तर दुसऱ्या डोसचे ७८.६८ टक्के आहे. धाराशिव (९९.५९ टक्के), लातूर (९७.८४ टक्के) आणि सोलापूर (९५ टक्के पेक्षा जास्त) जिल्ह्यांनी उत्कृष्ट कामगिरी केली आहे. मात्र रायगड ५५ टक्के पहिला डोस व ४८ टक्के दुसरा डोस, पुणे आणि पीसीएमसी भागात दुसऱ्या डोसचे प्रमाण तुलनेने कमी असल्याचे दिसून आले आहे. राज्यात जपानी मेंदूज्वराच्या निदानासाठी नागपूर, गडचिरोली, सेवाग्राम (वर्धा), भंडारा आणि गोंदिया येथे पाच सेंटीनेल केंद्रे कार्यरत आहेत. तसेच १६ जिल्ह्यांमध्ये बाल अतिदक्षता विभाग (झखउण) सुरू असून रुग्णांना आवश्यक उपचार सुविधा उपलब्ध आहेत.

आरोग्य विभागाच्या माहितीनुसार विदर्भ हा जपानी मेंदूज्वरासाठी सर्वाधिक संवेदनशील भाग आहे. ग्रामीण व कृषी क्षेत्रात डासांची वाढ, तसेच डुक्कर व पक्ष्यांच्या संपर्कामुळे संसर्गाचा धोका अधिक असतो. काही शहरी व उपनगरी भागातही साथीचा धोका संभवतो.

राज्यात नियमित लसीकरण, विशेष मोहिमा, रक्त नमुना तपासणी, डास नियंत्रणासाठी धूरफवारणी, क्यूलेक्स डासांचे सर्वेक्षण, जनजागृती, डासांच्या उत्पत्तीस्थळांवर गप्पी मासे सोडणे तसेच स्वच्छता मोहिमा राबविण्यात येत आहेत. जपानी मेंदूज्वर हा आजार विशेषतः लहान मुलांसाठी धोकादायक असल्याने नागरिकांनी लसीकरण करून घ्यावे, डासांपासून संरक्षण करावे आणि ताप किंवा मेंदूशी संबंधित लक्षणे दिसल्यास त्वरित वैद्यकीय सल्ला घ्यावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

## लिंबागणेशकरांची आर्तहाक; मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी 'मुस्लिम आरक्षण एल्गार मोर्चात'सहभागी होण्याचे आवाहन

बीड (सरकार): मुस्लिम समाजाच्या शैक्षणिक, सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी आरक्षण ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन करत, सकल मुस्लिम समाजाच्या वतीने उद्या दि.१७ एप्रिल रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालयावर आयोजित करण्यात आलेल्या एल्गार मोर्चाला लिंबागणेशकरांनी जाहीर पाठिंबा दर्शविला आहे. या पार्श्वभूमीवर अठरापगड जाती-धर्मातील नागरिकांनी न्याय हक्कासाठी मोठ्या संख्येने मोर्चात सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

डॉ. गणेश ढवळे यांनी सांगितले की, हा मोर्चा कोणत्याही राजकीय पक्षाचा किंवा वैयक्तिक स्वार्थासाठी नसून तो संपूर्ण मुस्लिम समाजाच्या न्याय हक्कासाठी आहे. समाजातील शैक्षणिक व सामाजिक मागासलेपण दूर करण्यासाठी शिक्षण, नोकरी तसेच विविध शासकीय योजनांमध्ये मुस्लिम समाजाला ५ टक्के आरक्षण मिळावे, ही दीर्घकाळापासूनची व न्याय्य मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले.



पुढील पिढीचे भवितव्य सुरक्षित ठेवण्यासाठी हा लढा आवश्यक असून, या ऐतिहासिक आंदोलनात सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहनही त्यांनी केले.

यावेळी डॉ. गणेश ढवळे, सरपंच बालासाहेब जाधव, राजेभाऊ गिरे, रविंद्र निर्मळ, विक्रांत वाणी, औदुंबर नाईकवाडे, अर्जुन घोलप, शेख शफी,नूर सय्यद, बाळासाहेब मुळे, समीर शेख, सय्यद अख्तर, सय्यद बशीर, रामदास मुळे, सुरेश निर्मळ, गणपत तागड, शेख शफीक, सय्यद सलीम, शेख वसीम, शेख उस्मान, सय्यद फिरोज, सय्यद रियाज, सय्यद ताहेर, सय्यद रूऊफ, सय्यद सालम, उमर शेख, सय्यद नाझीम, शेख बबलू, सय्यद आरेफ, शेख नाझीम, शेख शौकत, सय्यद आयुब, भास्कर आबदार, बबन गोंडे आदींसह इतर नागरिक उपस्थित होते.

हे पत्रक मालक मुद्रक व प्रकाशक, संपादक आदोडे साहस पंढरीनाथ यांनी वरद प्रिंटर्स,जालना रोड,सहयोगनगर,बीड-४३११२२ येथे छापून कार्यालय सायं.दैनिक बीड सरकार संत नामदेवनगर, धानोरा रोड,बीड-४३११२२ येथे प्रकाशित केले आहे. मोबाईल नं.९८५०७९४७७९
(या अंकामधील छापलेल्या मजकुराशी संपादक/प्रकाशक सहमत असतीलच असे नाही- वाद बीड न्यायालया अंतर्गत)

Daily Evening Beed Sarkar Owner,Printer,Publisher and Editor Adode Sahas Pandhrinath has Varad Printers,Jalna Road Sahayog Nagar,Beed-431122 (Mahrashtra) and Published In Office Evening Daily Beed Sarkar,Sant Namdevnagar, Dhanora Road, Beed-431122. Mobile No. 9850794779
(The editors / publishers do not necessarily agree with the printed text in this issue - under the Beed Court of Appeals)